सचिव व सचिव समकक्ष दर्जाच्या कार्यकारी संचालक / महासंचालक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१४१७/(२६६ (भाग-२)/२०१७)/आ (वर्ग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०२ जानेवारी, २०१८.

संदर्भ : १. जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एसएलएस-१४१७(२६६/२०१७) आ (वर्ग-१)..(२), दि.०१.११.२०१७.
२. सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२ A/१६-ब, दि. ०२.११.२०१७.
३. जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एसएलएस-१४१७(२६६/२०१७) आ (वर्ग-१), दि.०७.११.२०१७.

शासन आदेश :-

जलसंपदा विभागातील मुख्य अभियंता (स्थापत्य) संवर्गातील श्री. रसिक मदनलाल चौहान यांना सचिव व सचिव समकक्ष दर्जाच्या कार्यकारी संचालक पदावर `३७४००-६७००० + श्रेणीवेतन १००००/- या वेतनश्रेणीत संदर्भीय दि.१७.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आस्थापना मंडळाने शिफारस केल्यानुसार श्री.रसिक मदनलाल चौहान (खुला) यांना तदर्थ / तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्याबाबतचे आदेश दि.०१.११.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले.

२. तदनंतर संदर्भ क्र. २ येथील पत्रानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.२७९७/२०१५ प्रकरणी मा न्यायालयाने दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाचा दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना देण्यात आलेले पदोन्नतीमधील आरक्षण रद्द ठरविले आहे. मा. न्यायालयाच्या वरील आदेशाविरूध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालय येथे विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली असून मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होईपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नतीची प्रक्रिया स्थगित ठेवण्याबाबतच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सामान्य प्रशासन विभाग /१६-ब कार्यासनाच्या अनौ. संदर्भ क्र.२५६ अे/१७, दि.०६.११.२०१७

रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार संदर्भ क्र.३ नुसार श्री. चौहान यांचे पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात आले होते.

३. तद्नंतर या विभागाने सामान्य प्रशासन विभाग /१६-ब यांना अभिप्रायार्थ सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, सामान्य प्रशासन विभाग/१६-ब तसेच विधी व न्याय विभाग यांनी अनुक्रमे दि.०६.१२.२०१७ व दि.०८.१२.२०१७ रोजी दिलेले अभिप्राय विचारात घेता, श्री. रसिक मदनलाल चौहान (खुला) यांच्याबाबतचे दि.०७.११.२०१७ रोजीचे आदेश रद्द करून दि.०१.११.२०१७ रोजीचे पदोन्नतीने पदस्थापनेबाबतचे शासन आदेश सक्षम प्राधिकाराच्या मान्यतेने पुन:स्थापित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१८०१०३१०५८३२७६२७** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Jagdish Sajanikar

Digitally signed by Prashant Jagdish Sajanikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a8cd67058795ac5a961c2b41207cb6d24b79e17716af754c9fc40fd4145416f1, serialNumber=217003e42c820ec29c89162937f98929453cc6295b34f71ea285041053a66aa7, cn=Prashant Jagdish Sajanikar
Date: 2018.01.03 11:24:42 +05'30'

(प्रशांत साजणीकर)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
३) मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) प्रधान सचिव (जलसंपदा) / सचिव (लाक्षेवि)/सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.

८) सर्व मुख्य अभियंता तथा सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व अधीक्षक अभियंता तथा उप सचिव, जलसंपदा विभाग
१०) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
११) खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
१२) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१३) संबंधीत अधिकारी.
१४) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१५) सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१६) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.